PARLE MAHOTSAV
Organiser - ADV. PARAG ALAVANI, President, Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahotsav.com

दिनांकः 25.12.2015

## कृपया प्रसिद्धीसाठी

# १६व्या पार्ले महोत्सवमध्ये आंतरराष्ट्रीय पारितोषिक विजेत्या खेळाडुंचा सहभाग

मुंबई दि. २५ : आपल्यामध्ये असलेल्या सुप्त कलागुणांना विकसित करायचे असेल तर आपल्या तोडीच्या किंबहुना आपल्यापेक्षा सरस लोकांसोबत स्पर्धा करण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे प्रतिपादन १६ व्या पार्ले महोत्सवाचे प्रमुख आयोजक आमदार पराग अळवणी यांनी केले. पार्ले महोत्सवात नेमकी हीच संधी मिळवून देण्याचा प्रयत्न आम्ही करत आहोत असेही त्यांनी सांगितले. १६ व्या पार्ले महोत्सवाच्या सहाव्या दिवशी गायन, योगा, हस्ताक्षर, एकपात्री प्रयोग, वक्तृत्व, पथनाट्य, मलखांब तसेच सुदृढ बालक स्पर्धा अशा ७ स्पर्धांच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

सुदृढ बालक स्पर्धेतील शुभ्रा व नितीन म्हामुणकर यांच्या फक्त ६ दिवसांच्या तान्ह्या बाळापासून ते ज्येष्ठ नागरिक स्पर्धेतील ८६ वर्षीय वसंत म्हात्रे यांच्यापर्यंत तसेच केवळ गंमत म्हणून रविवारी आपल्या सोसायटीत व्हॉली बॉल किंवा गल्ली क्रिकेट खेळणाऱ्यांपासून ते आंतरराष्ट्रीय खेळाडू व कलावंतांच्या सहभागाने महोत्सवाचा सहावा दिवस अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण ठरला./ रायफल शूटिंग स्पर्धेत कॉमनवेल्थ गेम्स मधील/ सुवर्णपदक विजेता समीर आंबेकर, जागतिक रेल्वे स्पर्धेतील सुवर्णपदक मानकरी विश्वजीत शिंदे व याशिका शिंदे यांच्यासह ३५ राष्ट्रीय खेळाडू, तर शिवछत्रपती पुरस्कार मानकरी दिनकर देशपांडेसह सुमारे ४० राष्ट्रीय खेळाडूंनी व्हॉली बॉल स्पर्धा व आंतरराष्ट्रीय खेळाडू अदिती तालकर हिच्यासह ६ राष्ट्रीय खेळाडूंनी योग स्पर्धेतून महोत्सव गाजवला.

-------------------------------------------------------------

सदर प्रसिद्धीपत्रक गुरुचरण सिंह संधू, अध्यक्ष, आयोजन समिती यांनी प्रसिद्ध केले आहे.